/

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण JTR/2018/23392

सहकार कक्ष, झोपुप्रा, मुंबई

जा.क्र.झोपुप्रा/सनिस/कार्यासन-१/टे.सी.३/ /सन २०१८

दिनांक : ११ /०४/२०१८

**प्रति,**

**मुख्य प्रवर्तक,**

श्री.पवन चौधरी,

(नियोजित) एल ॲण्ड टी क्रिसेट बे टी-४ को. ऑप. हौसिंग सोसायटी,

सी. एस. नं.४३२, ६५६ पार्ट, डिव्हीजन परेल शिवडी,

भोईवाडा, परेल, मुंबई-४०००१२

**विषय :- नियोजित सहकारी संस्थेसाठी नांव राखून ठेवणे व नियोजित संस्थेच्या नांवाने बँक खाते उघडण्यासाठी परवानगी.**

१. आपला वरील विषयाबाबतचा दिनांक २७/०३/२०१८ रोजी या प्राधिकरणाकडे सादर केलेल्या नांव आरक्षण प्रस्तावाचे अवलोकन व्हावे.

२. आपणास कळविण्यात येते आहे की, आपले नांव आरक्षण अर्जाप्रमाणे आपण सुचविलेले नांव **(नियोजित) एल ॲण्ड टी क्रिसेंट बे टी-४ को. ऑप. हौसिंग सोसायटी,** हे नांव आपले नियोजित संस्थेसाठी राखून ठेवण्यात आले आहे. यापुढे संस्थेची नोंदणी होईपर्यत या कार्यालयाशी व इतरत्र पत्रव्यवहार करतांना संस्थेच्या नांवापूर्वी नियोजित हा शब्द ठळक अक्षरात लिहावा. नियोजित संस्थेचा नोंदणी प्रस्ताव आवश्यक कगदपत्रासह या पत्राच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या मुदतीमध्ये या कार्यालयाकडे आपणास पाठवावा लागेल अन्यथा मुदत संपल्यानंतर नियोजित संस्थेसाठी राखून ठेवलेले नांव रद्द झाले आहे असे समजण्यात येईल व त्यासाठी कोणतेही सुचना पत्र पुन्हा पाठविण्यात येणार नाही याची कृपया आपण नोंद घ्यावी, रद्द झालेले नांव दुसऱ्या नियोजित संस्थेसाठी देता येईल.

३. नियोजित संस्थेच्या नांवाने <u>मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, मुंबई,</u> या बँकेच्या शाखेमध्ये बँक खाते उघडण्यात या पत्राद्वारे परवानगी देण्यात येत आहे. नियोजित संस्थेच्या नांवाने बँक

उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर (झोपुप्रा) सत्यमेव जयते मुंबई

खाते दिलेल्या मुदतीमध्ये उघडावयास पाहिजे. बँक खात्यातून संस्थेची नोंदणी होईपर्यंत रक्कम कार्यालयाच्या लेखी परवानगी शिवाय काढता येणार नाही. संस्थेसाठी राखून ठेवलेले नांव रद्द झाल्यास

नियोजित संस्थेच्या नांवाने बँक खात उघडले असल्यास बँक खाती शिल्लक असलेल्या रक्कमेचे या कार्यालयामध्ये प्राधिकृत अधिकाऱ्यासमोर वर्गणीदाराच्या भागाप्रमाणे त्यांना रकमेचे वाटप केले पाहिजे.

४. नियोजित संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक छापील नमुना अर्ज, नमुना पोटनियम व इतर कागदपत्रे मुंबई जिल्हा संकारी हौसिंग फेडरेशन लि. विकासक प्रिमायसेस, ११ बँक, स्ट्रिट, फोर्ट, मुंबई-४००००१ येथे उपलब्ध आहेत. नोंदणी फी रूपये २५००/- रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई, येथे विभाग- **Co -operation Department** प्रधानशिर्ष-०४२५ **Co -operation** उपप्रधान शिर्ष- ८०० **Other Receipt** गौण शिर्ष- **XIX Registration Fee** संगणक संकेतांक : ०४२५००३६ या लेखा शिर्षकाखाली चलनाने भरणा करावी व भारणा चलन नोंदणी प्रस्तावासोबत या कार्यालयाकडे सादर करावे.

(आर. टी. इटकर)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, मुंबई शहर, झो.पु.प्रा.मुंबई.

प्रत - माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना
**शाखा व्यवस्थापक,**
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित., शाखा- परेल